**प्रेस नोट** दिनांक. ०८/०१/२०२५

**सिने अभिनेत्रीच्या घरात चोरी करणा-या इसमास अटक करून गुन्हा उघडकीस आणलेबाबत.**

तक्रारदार श्री संदेश मणिलाल चौधरी वय ३९ वर्ष, धंदा-नोकरी, रा.ठी. गगनगिरी अपार्टमेंट पूजा गार्डन भाईंदर पूर्व यांनी खार पोलीस ठाणे येथे समक्ष हजर राहून फिर्याद दिली की, ते सिने अभिनेत्री श्रीमती पुनम ढिल्लोन रा.ठी फ्लॅट नंबर ३०१, ३०२ पालीमाला रोड पाली हिल बांद्रा (पश्चिम) मुंबई यांच्याकडे मॅनेजर म्हणून नोकरीस आहेत. दिनांक ०५/०१/२०२५ रोजी श्रीमती पुनम ढिल्लोन यांच्या मुलाने त्यांचे घरातील कपाट उघडून पाहिले असता त्यामध्ये ठेवलेली रोख रक्कम व डायमंड चे कानातील टॉप हे मिळून आले नाहीत त्याबाबत त्यांनी घरातील नोकर व इतर इसम यांच्याकडे चौकशी केली. परंतु, कोणतीही माहिती उपलब्ध न झाल्याने त्यांनी सदरची रोख रक्कम व डायमंडचे कानातील टॉप चोरीस गेलेबाबत दिलेल्या तक्रारीवरुन खार पोलीस ठाणेस गुरक क्रमांक १५/ २५ कलम ३०५ भा. न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

नमूद गुन्हयाच्या तपासाच्या अनुषंगाने खार पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि कोकणे व पथक यांनी घटनास्थळास तात्काळ भेट देऊन फिर्यादी यांचे फ्लॅटमध्ये दिनांक ०४/०१/२०२५ ते ०५/०१/२०२५ चे दरम्यान कामानिमित्त व भेटीनिमित्त आलेल्या इसमांकडे कसून तपास केला असता सिने अभिनेत्री पूनम ढिल्लोन यांचे घरी रंगकाम करण्याकरता आलेल्या तीन इसमांकडे केलेल्या तपासातील कथनामध्ये विसंगती आढळून आल्याने त्यांच्याकडे अधिक सखोल तपास केला असता रंगकाम करणारा इसम नामे समीर सलीम अन्सारी वय ३७ वर्ष याने पुनम ढिल्लोन यांच्या घरी चोरी केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने, त्यास नमूद गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत गुन्हयाच्या तपासादरम्यान आरोपी समिर सलिम अन्सारी वय ३७ वर्षे याच्याकडून एक डायमंडचा कानातीली टॉप किंमत अंदाजे १०००००/- रुपये व रोख रक्कम २६०००/- रुपये असा एकूण १२६०००/- रुपये किंमतीची मालमत्ता व अमेरीकन चलनातील ५०० यु.स.डॉलर अशी मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

**खार पोलीस ठाणे यांनी नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेले आरोपीचे नाव :-**

१) समीर सलीम अन्सारी, मु, वय ३७ वर्षे,

सदरची कामगिरी हि मा. पोलीस आयुक्त श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त श्री. सत्यनारायण चौधरी, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ९ श्री. दिक्षीत गेडाम, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, बांद्रा विभाग श्री. अधिकराव पोळ, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खार पोलीस ठाणे श्री. संजीव धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. वैभव काटकर, गुन्हे प्रकटीकरण अधिकारी स.पो.नि श्री. दत्ता कोकणे, स.पो.उ.नि श्री. मनोज वैद्य, गुन्हे प्रकटीकरण पथकातील अंमलदार पो.ह.क्र ०४.०५३०/श्री. निकम, पो.शि.क्र ०९. ३२२१/श्री. जाधव, पो.शि.क्र ११.०६६४/श्री. गळवे, पो.शि.क्र ११.३१७०/श्री. कदम यांनी सदरची कामगिरी कर्तव्याच्या वेळेचा विचार न करता उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.